# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश.

४१८
जा.क्र.वि-१/शुभम को.ऑप. हौ.सो/क.८८/आदेश/२०१७
उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक तालुका नाशिक यांचे कार्यालय, सहकार संकुल, नॅशनल ऊर्दू हायस्कूल जवळ, सारडा सर्कल, नाशिक.
दिनांक २२/१२/२०१७

वाचावे :- १) मा. जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र./लेप/प्रशा.अह/शुभम हौ.सोसा/सन०८-१२/सन १५ दिनांक १९/०९/२०१५ रोजीचा प्रशासकीय विशेष अहवाल.

२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.वि-६/शुभमहौसिंगसो/कलम ८३/चौकशी/आदेश/२०१५ दिनांक ०५/१०/२०१५.

३) ॲड. श्री मंगेश प्रभाकर कासार, प्राधिकृत अधिकारी यांचा कलम ८३ अन्वये चौकशी अहवाल.

४) मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिनांक ०९/०२/२०१७ रोजी तयार केलेली प्राधिकृत चौकशी अधिकाऱ्यांची नामतालिका.

५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतुद.

ज्याअर्थी, शुभम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं.२४३, महात्मा नगर, त्र्यंबकरोड, नाशिक (जिचा उल्लेख यापुढे 'संस्था' असा केला आहे) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ (ज्याचा उल्लेख यापढे 'अधिनियम' व 'नियम' असा केला आहे) अन्वये नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था असुन, तिचा नोंदणी क्रमांक एनएसके/एनएसके/एचएसजी/१४७३/सन १९८३, दिनांक २६/०१/१९८३ असा आहे आणि नमूद संस्थेचे कामकाज या कार्यालयाचे कार्यकक्षेत येते.

२/- ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ मधील तरतुदी त्याचबरोबर संस्थेच्या मंजुर उपविधीतील तरतुदी नुसार संस्थेचे दैनंदिन कामकाज करणे सर्व सबंधितांवर बंधनकारक आहे.

३/- ज्याअर्थी, नमूद संस्थेचे दिनांक ०१/०४/२००८ ते ३१/०३/२०१२ या कालावधीच्या फेरलेखापरीक्षण अहवालात लेखापरिक्षक यांना आढळून आलेल्या गैरव्यवहाराबाबत प्रशासकीय विशेष अहवाल मा. जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, नाशिक यांनी उक्त वाचावे क्रमांक ०१ अन्वये या कार्यालयास सादर केला असुन पुढील योग्य ती कायदेशिर कारवाई करण्याची विनंती केलेली आहे. सदर विशेष अहवालात लेखापरिक्षक यांनी नमुद केलेले गंभीर स्वरुपाचे मुद्दे पहाता, संस्थेच्या तत्कालिन संचालक मंडळाने, कर्मचारी वर्गाने आपल्या जबाबदाऱ्या व कर्तव्य पार पाडण्यात कसूर करुन मोठ्या प्रमाणावर संस्थेच्या निधीचा दुरुपयोग केल्याने संस्थेचे आर्थिक नुकसान झालेले असल्याचे नमुद केलेले आहे.

२/-

४/- ज्याअर्थी, विशेष अहवालाची छाननी केली असता सदर अहवालात गंभीर बाबी निदर्शनास आल्याने त्याबाबत सखोल चौकशी करणेसाठी या कार्यालयाने वाचावे क्रमांक ०२ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ८३ (१) अन्वये चौकशी अधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे.

५/- ज्याअर्थी, चौकशी अधिकारी यांनी संदर्भ क्रमांक ०३ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ८३ (१) अन्वये चौकशी करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. सदर चौकशी अहवालात चौकशी अधिकारी यांनी आदेशात नमुद १ ते ४ मुद्यांबाबत संचालक मंडळ जबाबदार असल्याचे दिसुन येते पुढील चौकशी होणे आवश्यक आहे व तफावत दिसुन आलेल्या रक्कमां बाबतची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. तसेच दिनांक०१/०४/२००८ ते ३१/०३/२०१२ या कालावधीत पंचकमेटी पदाधिकारी व संचालक यांनी संस्थेचे कामकाज व व्यवस्थापन उपविधीतील तरतुदी नुसार केलेले नाही व दप्तर रितसर ठेवलेले नाही त्यामुळे मुद्या क्रमांक १ ते ४ बाबत महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ८८ (१) अन्वये व्यक्तिनिहाय जबाबदारी निश्चितीसाठी चौकशी होणे योग्य वाटते असे अभिप्राय नमुद केले आहे.

६/- त्याअर्थी शुभम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., महात्मा नगर, नाशिक या संस्थेच्या दिनांक ०१/०४/२००८ ते ३१/०३/२०१२ या कालावधीच्या महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ८३ (१) च्या चौकशी अहवालात नमुद आर्थिक नुकसानीचे व्यक्तीनिहाय प्रमाण व जबाबदारी निश्चित करणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८(१) अन्वये कारवाई होणे आवश्यक असल्याच्या निर्णयाप्रत हे कार्यालय आल्याने मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

मी, डॉ. प्रिया दळणर, उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक तालुका नाशिक मला महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचे कडील अधिसूचना क्रमांक सीएसएल-१४९३/११६२/सीआर-४७/१५-सी, दिनांक ०७/०८/१९९३ व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारा नुसार, **शुभम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., महात्मा नगर, त्र्यंबकरोड, नाशिक या** संस्थेच्या दिनांक ०१/०४/२००८ ते ३१/०३/२०१२ या कालावधीच्या कलम ८३ (१) च्या आदेशात नमुद केलेल्या सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद मुद्यांवर संस्थेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीचे व्यक्तीनिहाय प्रमाण व जबाबदारी निश्चित करणेसाठी वाचावे क्रमांक ०४ अन्वये तयार करण्यात आलेल्या नामतालिके वरील **ॲड.श्रीमती श्रध्दा एस. काबरा (चंद्रात्रे)** यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी प्रस्तुत आदेशा सोबत सहपत्रित केलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद मुद्यांचे अनुषंगाने संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीचे सबंधीत व्यक्तीनिहाय प्रमाण निश्चित करुन, जबाबदारी निश्चित करण्यासाठी योग्य त्या कायदेशिर कार्यपध्दतीचा अवलंब करावा तसेच सबंधितांना झालेल्या आर्थिक नुकसानीचे भरपाई बाबत आवश्यक ते आदेश करावेत.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी सदरची चौकशी या आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्यांचे आंत पूर्ण करावी व नुकसान भरपाई बाबतचे आदेश तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावे. प्राधिकृत चौकशी अधिकारी यांचे मेहनताना मंजुर करण्याबाबतचे आदेश अलाहिदा पारीत करण्यात येतील.

३/-

सदरचा आदेश आज दिनांक२२/१२/२०१७ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला असे.

दिनांक २२/१२/२०१७
ठिकाण नाशिक

(डॉ. प्रिया दळणर)
उपनिबंधक
सहकारी संस्था, नाशिक तालुका नाशिक.

प्रति,

१) चेअरमन / सेक्रेटरी, शुभम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं.२४३, महात्मा नगर, त्र्यंबकरोड, नाशिक.

२/- त्यांनी प्राधिकृत चौकशी अधिकारी यांना चौकशी कामी आवश्यक असणारे दप्तर उपलब्ध करुन देऊन आवश्यक ते सर्व सहकार्य करावे.

२) ॲड.श्रीमती श्रध्दा एस. काबरा (चंद्रात्रे), प्राधिकृत चौकशी अधिकारी, पत्ता :- प्लॅट नं.१२, उज्वल अपा. सुयोग कॉलनी, गिरणाटाकी, रोड, जळगांव.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर.**

३) मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक.

४) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक.

उपनिबंधक
सहकारी संस्था, नाशिक तालुका नाशिक.

उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक तालुका नाशिक यांचे कार्यालयाकडील आदेश जा.क्र.वि-१/ शुभम हौ.सो/क.८८/आदेश/२०१७, दिनांक २२/१२/२०१७ सोबतचे

## परिशिष्ट 'अ'

**संस्थेचे नांव :-** शुभम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं. २४३, महात्मा नगर, त्र्यंबकरोड, नाशिक.

**कलम ८८ अन्वये करावयाच्या चौकशीचे मुद्दे खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र | मुद्या | रक्कम रुपये |
|---|---|---|
| मुद्दा क्रमांक ०१ :- | दिनांक ३१/०३/२००८ च्या ताळेबंदानुसार अखेरची शिल्लक रु ५९३५.५० पुढील दिनांक ०१/०४/२००८ रोजीच्या किर्दिला आरंभी शिल्लक म्हणुन घेतलेली नाही. सदर आर्थिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्या सबंधित व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करणे. | ५९३५.५०/- |
| मुद्दा क्रमांक ०२ :- | दिनांक ०१/०४/२००८ ते ३१/३/२०१२ या मुदतीत संस्थेच्या सचिवांनी रोख शिल्लक कमी/अधिक जमा नांवे करुन घटविलेल्या व्यवहारास जबाबदार असणा-या संबंधित व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करणे. | ५३५२/- |
| मुद्दा क्रमांक ०३ :- | रक्कम रु.४९,५४६/- चेक ने बँकेतुन काढून सदर रक्कमा कोणत्या कारणासाठी खर्च केल्या त्याबाबतच्या व्यवहारास जबाबदार असणा-या संबंधित व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करणे. | ४९,५४६/- |
| मुद्या क्रमांक ०४:- | संस्थेच्या सन २००८-२००९, २००९-२०१०, २०१०-२०११ व सन २०११-२०१२ या कालावधीच्या तेरीज पत्रकामध्ये अनुक्रमे रक्कम रुपये २१,४३३, ६१६४, ४४,२१९ व ४७५ अशी एकुण रक्कम ७२,२९१ इतक्या रकमेच्या फरकामुळे संस्थेच्या निधीचा दुरुपयोग होऊन संस्थेचे आर्थिक नुकसान झालेले असल्याने सदर आर्थिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्या सबंधित व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करणे. | ७२,२९१/- |

DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETY उप निबंधक सहकारी संस्था नाशिक तालुका नाशिक NASIK TALUKA NASIK

उपनिबंधक
सहकारी संस्था, नाशिक तालुका नाशिक.